Vol 3 Issue 4 Oct 2013

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-4, Oct-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# 18 व्या शतकातील महाराष्ट्रातील रूढी व परंपरा

**प्राचार्य डॉ. बी.व्ही. चौधरी**
वसुंधरा कला महविद्यालय, जुळे सोलापूर, सोलापूर.

**सारांश :**18 व्या शतकात समाजात धर्माचा प्रभाव मोठया प्रमाणावर असल्यामुळे धर्मभोळया समजुती, रूढी व परंपराही मोठया प्रमाणावर पाळल्या जात होत्या. स्त्रियांच्या सामाजिक, धार्मिक चालीरिती, रितीरिवाज, आचार विचार, कर्मकांड विधी इत्यादीबाबत प्राबल्य होते. हा सामाजिक रितीरिवाज कोणी मोडला तर त्यास गोतसत्ता शिक्षा देत असे.

## प्रस्तावना

ब्राह्मण वेदशास्त्राचे अध्ययन, अध्यापन, पूजा–अर्चा, यज्ञ, पोथी–पुराणे या सर्व प्रकारची कामे करीत असल्यामुळे लोक त्यांना भूदेव मानत असत. ब्राह्मणसाठी वेदोक्त संस्कार, पूजा वगैरे असायचे तर ब्राह्मणेत्तरांसाठी पुराणोक्त संस्कार असायचे. समाजात हा धार्मिकवेद पूर्वीपासूनच रूढ होता.

ब्राह्मणांना समाजाकडून सतत दानधर्म मिळत असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली होती. समाजात वावरतांना ते खूपच कर्मठपणा बाळगीत असत. त्यांच्यातही वरिष्ठ–कनिष्ठ असे भेद होते. ब्राह्मण जातीत मुलीच्या पित्याकडून पैसे घेऊन विवाह करण्याची परंपरा नव्हती. असे केल्यास शिक्षा करण्यात येई.[1] असे एका तत्कालीन पत्रान्वये कळते. सामवेदी ब्राह्मणातही हुंडा घेणे देणे ही प्रथा नव्हती. एवढेच नव्हे तर सामवेदी ब्राह्मण विधवेचे केशवपनही करीत नसत.[2] इतर ब्राह्मणात मात्र या चाली अत्यंत कठोरपणे पाळल्या जात असत.

महाराष्ट्रातील ब्राह्मणवर्गात यजुर्वेदी, सामवेदी, ऋग्वेदी, कोकणस्थ, देशस्थ, कायस्थ, पताणे, प्रभू आणि ब्राह्मणजाई अशा पोटजाती आढळून येतात. शिवकाळात तसेच पेशवेकाळात ब्राह्मण व प्रभू यांच्यात चालीरिती, रूढी, परंपरा यावरून अनेकदा वाद उफाळून येत होते.

शिवकाळात प्रभू हे ब्राह्मण आपली वेदोक्त कर्मे पार पाडीत असत. परंतु पेशवेकाळात काही ब्राह्मणांनी त्यांची वेदोक्त कर्मे बंद करावीत म्हणून राज्यकर्त्याकडे तक्रार केली होती. तसेच पाताणे ही प्रभूंची पोटजात समजण्यात येत असे. या चालीरितीबाबत माधवराव पेशवे यांनी नाना फडणविसांना पत्र लिहून ज्या ब्राह्मणांनी पाताणेंकडे मुंजी केल्या त्या ब्राह्मणांना बहिष्कृत करण्यात यावे.[3] असे म्हटले आहे.

समाजात ब्राह्मण जातीतही असा वरिष्ठ व कनिष्ठपणा काटेकोरपणे पाळला जात होता. प्रभू व पाताणे यांना कनिष्ठ समजले जात असे. त्यातून वादविवाद व असंतोष निर्माण होत असे. नारायणराव पेशव्यांनी तर प्रभूंचे सर्वच अधिकार काढून घेतल्यामुळे पेशव्यांच्या राजवटीत प्रभूंना चक्क शूद्र समजण्यात येत होते. त्यासाठी त्यांनी प्रभूंनी काय करू नये यासाठी नऊ कलमेच जाहीर केली होती. 1) प्रभूंनी वैदिक कर्मे करू नये. 2) वैदिकमंत्र उच्चारू नये. 3) शालिग्रामची पूजा करू नये. 4) भाताचे पिंड करू नये. 5) देवपूजा पुराणोक्त पद्धतीने करावी. 6) ब्राह्मणभोजन आपल्या घरी करू नये. 7) ब्राह्मणास दंडवत घालताना मोठयाने म्हणावे. 8) ज्या देवास शूद्र भजतात त्या देवाचे दर्शन घ्यावे. 9) प्रभू जातीत स्त्रियांना पुनर्विवाह करू द्यावा. प्रभू विधवा स्त्रियांनी केशवपन करू नये.[4] इत्यादी ही कलमे प्रभूंना शूद्र समजण्यास पुरेसी होती. एवढेच नव्हे तर बाजीराव पेशवे, चिमाजी अप्पा व बाळाजी बाजीराव या पेशव्यांनी ब्राह्मणांनी प्रभू व पाताणे यांच्या मुंजी करू नये असे फर्मानच काढले होते. सवाई माधवराव पेशव्यांनी सुद्धा प्रभू व पाताणे यांनी वरील नऊ कलमानुसारच आपले वर्तन ठेवावे असे म्हटले होते. यावरून जवळजवळ पेशवाईत पेशवे हे प्रभू व पाताणे यांना ब्राह्मण मानायलाच तयार नव्हते हे स्पष्ट दिसून येते. असे काही घडल्यास मुंज लावणाऱ्या ब्राह्मणास व प्रभू–पाताणे यांना जबर शिक्षा ठोठावण्यात येत असत.

तसेच ब्राह्मण व चित्तपावन यांच्यातही चालीरितीवरून वाद निर्माण होत असे. याजुष व चित्तपावन ब्राह्मणात भोजनावरून वाद झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे ब्राह्मण व सोनार यांच्यातही वाद होता. सोनार उपाध्ये वेदोक्त मंत्रांनी लग्ने व मुंजी करीत हे तत्कालीन ब्राह्मणांना पसंत नव्हते म्हणून त्यांच्याकडून वरील कर्मासाठी दंड व कैद अशा शिक्षा पेशव्याकडून केल्या जात. आपल्याच जातीतील उपाध्येपण हा मोठा गुन्हा मानला जात असे.[5] म. फुले यांनीही आपल्याच जातीत उपाध्येपण निर्माण केल्यामुळे त्यावेळी ब्राह्मणात फार मोठा असंतोष निर्माण झाला होता. 'सत्यशोधक जलशा'तून या प्रथेवर टीकात्मक लेखन आढळते.

प्रत्येक जातीच्या व समाजाच्या बंधनाच्या विशिष्ट परंपरा असत. या परंपरा मोडल्या गेल्या अथवा हक्कावर गदा आली तर समाजात मोठा वादंग निर्माण होत असे. असे वादंग राजदरबारी जाऊन धर्मशास्त्रज्ञांकरवी निवाडा करून गुन्हेगारास शासन दिले जात असे. त्यामुळे सामाजिक रूढी, परंपरा यांची जपणूक स्वत: पेशवेच जातीने करीत असत.

ब्राह्मण ब्राह्मणातील या वादाप्रमाणेच इतरही असे वाद निर्माण होत असत.

विजयादशमीला रेडा बळी देण्याची चाल समाजात रूढ होती. बळी दिलेला रेडा घेण्याच्या हक्कावरून महार–मांग यांच्यात वाद होत. बळीचा रेडा घेण्याचा अधिकार महारांचा आहे[6] असे तत्कालीन कागदपत्रावरून दिसून येते.

न्हाव्याचा व्यवसाय हजामती करणे, परंतु त्यांनी कोणाच्या हजामती कराव्यात व कोणाच्या करू नये यावरही त्याकाळात वाद

होता. पन्हाळयावर असाच वाद निर्माण झाला असता न्हाव्यांनी बुरूड जातीच्या लोकांच्या हजामती करू नये असे पंचांनी ठरविले होते. असाच वाद न्हावी व चांभार यांच्यातही होता.[7]

अशा प्रकारे ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर समाजात आपल्या हक्कासंबंधी अनेक वाद निर्माण होत असत. 18 व्या शतकातील प्रस्तुत जातियतेची मुळे अधिक मजबूत होण्यास हे वादच कारणीभूत ठरत असत.

अगदी साध्यासाध्या गोष्टीवरून समाजाअंतर्गतही वाद उफाळत असत. त्याचे परिणाम सामाजिक बहिष्कारात होत असे हे बहिष्कारही अत्यंत कठोर पद्धतीने पाळले जात असत.

या काळात काही मानपानाचे रितीरिवाज होते. मुधोजी भोसले यांच्या दरबारात गंध लावून जाणे ही भोसले यांची प्रथा होती. त्या प्रथेनुसार जर कोणी गंध लावून गेला नाही तर त्यास दंड व शिक्षा होत असे.

जिवबा फडणीस गंध न लावताच मुधोजी भोसले यांच्या दरबारात गेला तेव्हा त्याच्याकडून 5 रूपयाचा दंड वसून करण्यात आला होता.[8]

गावोगाव गंध लावण्याचा मान प्रथम कोणाचा, लग्नातील पाने घेणे, हक्क वगैरे बाबतीत काही नियम असत. ते मोडल्यास राजदरबारी त्याची दखल घेऊन न्यायनिवाडा होत असे. श्राध्द घालण्याची रूढी–परंपरा, दशक्रियाविधी, गंधमोकळा करणे या सर्वच गोष्टीबाबत गावोगावच्या काही प्रथा होत्या. त्या कटाक्षाने पाळल्या जात.

संबळ वाजविणे, गोंधळ घालणे यांचे अधिकार ज्या समाजाकडे व व्यक्तीकडे असे यावरून वाद निर्माण झाल्यास सरकार त्यात लक्ष घालीत असत.

काही गावातून ज्या जत्रा होत त्यात पूजेचा पहिला मान ठरलेला असे. अथवा पोळयाचा बैल वेशीतून बाहेर काढतांनाही पहिला मान ठरलेला असे. असे मान वंशपरंपरागत पाळले जात असे. यात काही मानपानावरून तंटा निर्माण झाल्यास गावची शांतता भंग पावत असे. अशावेळी सरकार त्यात लक्ष घालून वाद मिटवित असे. परंतु पुढे दोन घराण्यात पिढयानंपिढया वैमनस्य चालू असे.

### *स्त्रियांच्या बाबतीतील रूढी व परंपरा :*

अठरावे शतक म्हणजे स्त्रियांच्या बाबतीत अत्यंत कठोरतेने वागणारे शतक मानले जाते. पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रियांचा दर्जा हा कनिष्ठ मानला गेला आहे. रूढी आणि परंपरेत त्यांना जखडून ठेवण्यात आले होते. समाजात बहुपत्नीत्वाची चाल होती. बालविवाह, बालजरठविवाह, सती प्रथा या समाजमान्य रूढी होत्या. विधवा विवाह उच्चवर्णीय समाजात निषिध्द मानला जात असे. लहान वयातच विधवा झालेल्या मुलींना आयुष्यभर उपेक्षित जीवन जगावे लागत असे. केशवपन करणे, खाण्याच्या बाबतीतही निकृष्ट अन्न खाणे, लेणं नेसणं हलक्या प्रतीचे तर होते. आयुष्यभर अंधार कोठडीत खितपत पडावे लागत होते. कोणत्याही शुभकार्यात त्यांना प्रवेश नव्हता. मुळातच मुलगी जन्माला येणे क्लेशकारक मानले जाई.

### *बालविवाहाची रूढी व परंपरा :*

18 व्या शतकातील विवाहपध्दत ही स्त्रियांवर अन्याय करणारीच होती. मुलींचे लग्न आठ वर्षापर्यंत केले तर ते समाजमान्य होते. ऋतु येण्याच्या आत मुलीचे लग्न झाले पाहिजे असा समाजाचा दंडक होता. ही परंपरा ब्राह्मण समाजात काटेकोरपणे पाळली जात होती. स्मृतिकारांनीही केवळ आठ वर्षाची बालिका विवाहयोग्य समजावी[9] असे म्हटले आहे. इतर समाजात मात्र अशा वयाच्या अटी नव्हत्या. ब्राह्मण समाजात मात्र सर्रास असे बालविवाह रूढ होते.

या प्रकारच्या बालविवाहामुळे समाजात स्त्रीचा दर्जा खालावत गेला. बालवयातच विवाह करून आलेल्या मुली सासरी गांगरून जात. त्यांना कामाचा बोजा पेलवत नसे. त्यांना त्यासाठी मार खावा लागत असे. शास्त्राने पतीला याबाबत अधिकार दिला होता.[10]

पतीने पत्नीचे आणि पत्नीने पतीचे ऐहिक आणि पारलौकिक कल्याण साधावे ही हिंदू विवाहातही मूळ कल्पना जरी असली तरी प्रत्यक्षात पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रीचे स्थान गौण मानल्यामुळे या कल्पनेला छेद गेला व केवळ पत्नीनेच आपले कर्तव्य पार पाडावे. पुरूषाने कसेही वागविले तरी विरोध करू नये. पति देव मानून त्याची सेवा करावी या प्रथेबाबत ताराबाई शिंदे यांनी आपल्या ‘स्त्री–पुरुष तुलना’ या निबंधात कडक टीका केली आहे.

आई होणे हा स्त्रीचा धर्म असे. वंध्यत्व हे दुर्दैव्य मानीत. समाजात वांझ स्त्रीची अवहेलना होत असे. त्यामुळे तिचा शारीरिक व मानसिक विकास खुंटत जाऊन त्यांचे जगणे दुर्दैवी होत असे.

तिच्यावर सतत धार्मिक आणि सामाजिक बंधनांचा मारा जात असे. व्रत, वैकल्ये, उपास–तापास व सतत पतीचे कल्याण चिंतावे असे नियम होते. शिवाय स्त्रियांनी आपल्या पतीखेरीज अन्य पुरूषाचे मनात चिंतनही करू नये अथवा त्याच्याकडे ढुंकूनही पाहू नये. असा सामाजिक पतिव्रता धर्म होता. परंतु पुरूषांनी कितीही बायका करण्यात अथवा ठेवाव्यात त्यास मात्र बंधन नव्हती. उलट त्यातून त्यांचा पुरूषार्थच सिध्द होत होता. उलट पत्नीकडून असा काही प्रकार घडला तर तो व्यभिचार ठरवून तिला शिक्षा केली जात असे. हा पतिव्रत्याचा नियम श्वेतकेतूने घातला होता[11] व तो नियम 18 व्या शतकातील समाजजीवनात स्त्रियांच्या बाबतीत काटेकोरपणे पाळला जात होता. त्याला समाजमान्यता व राजमान्यताही होती.

### *विधवा विवाह अथवा पुनर्विवाह न करण्याची चाल*

या बाबतही स्त्रियांवर अन्यायच केला गेला आहे. अगदी लहान वयातही पती वारल्यानंतर त्या स्त्रियांना आजन्म अविवाहित राहावे लागत असे. हा सामाजिक नियम उच्चवर्णियात काटेकोरपणे पाळला जात असे त्यात ब्राह्मण समाजात तर पुनर्विवाहास बंदीच होती. विधवेने पुनर्विवाहाचा विचारही मनात आणू नये असे मनूनेही म्हटले आहे[12] पुनर्विवाहाचे कडक पालन इतर समाजात मात्र होत नव्हते. इतर समाजात मात्र पुनर्विवाह होत असे. त्याला पाट लावणे असे म्हणत.

ब्राह्मण समाजात मात्र आठ–नऊ वर्षाची बालविधवा 18 व्या शतकात दिनवाणे लाचार जिणे व्रतस्थपणे बिनतक्रार जगू लागली. आपला सुंदर चेहरा केशवपनाने विद्रुप करू लागली.

### *केशवपनची रूढी :*

18 व्या शतकात ब्राह्मणविधवा केशवपन करून आपला चेहरा विद्रुप करू लागल्या. ते सामाजिक बंधनामुळे. केशवपन या क्रियेचा उल्लेख निर्णयसिंधू (पृ. 626), मदन पारिजात (पृ. 2002–2003) स्मृतिमुक्ताफल (पृ. 160) या ग्रंथात येतात. 113.

हरि नारायण आपटे, बाबापद्मनजी यांच्या कादंबऱ्यातून केशवपनाची माहिती मिळते.

पतिनिधनानंतर विधवेने केस डोक्यावर राहू दिले तर तिच्या पतीचा आत्मा त्या केसांनी ती नरकात बांधून ठेवते असा

समज केवळ ब्राह्मण समाजात रूढ होता म्हणून पतिनिधनानंतर ब्राह्मण स्त्रीचे मुंडन करण्यात येई. तेही विधीपूर्वक. अशावेळी केशवपन विधी करणाऱ्या ब्राह्मणास दानधर्म केला जाई. शिवाय या विधीसाठी पंचा, पातळ, खण, जोडवी, मंगळसूत्र इत्यादी वस्तू ब्राह्मणास दान दिल्या जात.[13]

राधाबाईच्या केशवपनाच्या प्रसंगी पंचा, पातळ, खण, मणीमंगळसूत्र, जोडवी, गाय इत्यादी वस्तू ब्राह्मणास दान दिल्याचे दिसून येते[14]

### *सतीप्रथेची चाल :*

18 व्या शतकात उच्चवर्णीय समाजात सती प्रथेला फार महत्त्व होते. या सतीच्या चालीचा उगम प्राचीनकाळापासून होता. इजिप्तमध्येही मृताच्या प्रेताबरोबर त्याच्या स्त्रिया, दास, घोडे त्याला परलोकी हवेत म्हणून त्यांना मारून त्याच्या प्रेताजवळ गुहेत ठेवीत.[15] सतीप्रथा इतर देशातही अमलात येत असल्याचे दिसते. चीन, जपान, ग्रीक, सिथियन, जर्मन या देशातही विधवांना जाळण्याची चाल होती [16]

भारतातही सतीची चाल पूर्वीपासून होती असे म्हणता येत नाही. कारण भारतीय प्राचीन ग्रंथात सतीचे उल्लेच येत नाही. पुराणात मात्र सतीचे उल्लेख येतात. सतीची चाल मध्ययुगात मात्र अधिकच वाढली. एवढेच नव्हे तर सतीची चाल हे मध्ययुगातील वैशिष्टय मानले जाऊ लागले.

अनेक मराठा स्त्रिया व पेशव्यांच्या स्त्रिया पतिनिधनानंतर सती गेल्याचे ऐतिहासिक कागदपत्रावरून दिसून येते. सती जाणे हा विधी धर्ममूलक मानला जात होता. यास धर्मशास्त्राची पूर्ण मान्यता होती. सती जाणे म्हणजेच धर्मपालन करणे ही समजूत या कालखंडातीलच आहे. सती जाणाऱ्या स्त्रिया हा आर्य स्त्रीच्या पतिप्रेमाचा सर्वोच्च आदर्श ठरत असे.

### *पडदा पद्धतची चाल :*

पडदा पद्धत म्हणजे गोषा पद्धत. मुसलमान भारतात आल्यानंतर त्यांची पडदा पद्धत हिंदूनी उचलली असा समज आहे. राजपूत स्त्रिया, कुलीन मराठा स्त्रिया या पडदा पद्धतीचा अवलंब करीत असत.

### *दास–दासीची चाल :*

अठराव्या शतकात राजे घराण्यात दास–दासी बाळगण्याची प्रथा होती. ही प्रथा हिंदुस्थानात प्राचीन काळापासून चालू होती. दास व दासी यात फरक करावयाचा झाल्यास पेशवाईत दासापेक्षा दासीच अधिक प्रमाणात असल्याचे दिसून येते. या काळातील लोक दासींना कुणबिणी किंवा बटकी व दासांना पोरगे म्हणत. पेशवाईतील सरदार, राजे रजवाडे, श्रीमंत व सुखवस्तू लोक आपल्या पदरी कुणबिणी व बटकी बाळगीत. त्यांचा क्रयविक्रय करण्यात येई. जशा गोण्यात किंवा पागेत गाई–बैल किंवा घोडी तशाच कुणबिनी बटकी व पोरगे विकणे हा हेडे, चारण इत्यादी लोकांचा व्यवसाय होता[17] कुणबीन विकत घेणे व ठेवणे यास समाज मान्यता व राजमान्यता असलेली दिसून येते.

### *कुलाचार :*

18 व्या शतकात समाजात स्त्रियांनी पाळवयाच्या कुलाचार निश्चित करण्यात आले होते. पूजा, अर्चा, देवधर्म, उद्योगधंदे याबाबत 'कुलाचार' ठरलेले असत. तेच वंशपरंपरागत पाळले जात. कुलधर्म व कुलाचार यासाठी कुळाला अस्तित्व आहे असे जणू मानले जाई. 200 वर्षापूर्वीच्या एक जुन्या कापडावर बाळाजी बाजीराव पेशव्याने शास्त्रोक्त आचार चालू करण्याबद्दल आज्ञा लिहिलेल्या आहेत. त्यात स्त्रियांना अनुलक्षुन खालील आज्ञा केल्या आहेत.[18]

1)सूत्रस्त्रियांनी न काढावे.
2)नवरीने गळयात जवाळी (खारका, बदाम पिस्ते यांची) चांभाराने केलेली न घालावी. आपले घरी करून घालावी.
3)सौभाग्यवती स्त्रीने लाखेचा व नवरोटीचा चुडा न भरावा.
4)सौभाग्यवती स्त्रीने ब्राह्मण स्त्रीच्या पंगतीमध्ये विधवेने मधी बसोन भोजन न करावे.
5)सौभाग्यवतीने विधवेचे पंगतीस भोजनास न बसावे.
6)विधवा स्त्रीने शेंडी धरून विष्णूपूजा न करता ते शेंडी सोडावी. निर्मल मुंडन करावे.
7)ब्राह्मणांनी विवाहामध्ये नवऱ्या–नवरीचे पाईमोचे घालून कर्म न करावे.
8)सौभाग्यवती ब्राह्मण स्त्रीने चोळी धरावी. काचोळी टाकावी.
9)सौभाग्यवती ब्राह्मण स्त्रीने काशा–पितळेचे बिच्छवे न धरावे. रूप्याचे धरावे.
10)ब्राह्मणही स्त्रियांनी खांद्यावरी व कडेवरी उदक आणावे. मस्तकी जळ न धरावे.
11)ब्राह्मण भोजन व स्त्री सवाशीण भोजन यामध्ये विधवा पंगतीस नसावी.
12)भांड अपशब्दोच्चारणपूर्वक ब्राह्मण स्त्रीने मनी न धरावे वेदमंत्रोच्चारपूर्वक कर्मे करावी.
13)समस्त ब्राह्मणांनी विवाहामध्ये नवरा–नवरीच्या मस्तकी पुष्पमाला बांधाव्या.
14)जो ब्राह्मण मरेल त्याचे स्त्रीचे केस प्रथम अथवा दहाव्या दिवशी काढावे.
15)समस्त ब्राह्मण स्त्रिया यांनी प्रत्ययी स्नान करून सवस्त्र करून, वस्त्रे नित्य धुवून परिधान करावी. चोळी व लुगडी सोवळी धुवून ठेवावी.
16)ब्राह्मण जातीच्या समस्त विधवा स्त्रीने प्रथम रजोदर्शन झाल्यानंतर केस मस्तकी व आभूषण व चोळी, काचोळी लहंगा न धरावी. एक वस्त्र अकच्छ धारण करावे.
17)सौभाग्यवती ब्राह्मण स्त्रीने नाडे मस्तकी न धरावे.
18)सौभाग्यवती ब्राह्मण स्त्रीने गळयापासून मस्तकापर्यंत यथासामर्थ्य सुवर्ण आभूषण धरावे. रूप्याचे नग मस्तकी न धरावे.
19)सर्व ब्राह्मण स्त्रीने सव्य लुगडे नेसून कच्छ धरावी. लहंगा टाकावा.
20)ब्राह्मण जातीने ज्या गावी वधू असेल तेथे सहकुटुंब जाऊन तेथे मंडप घालून देवप्रतिष्ठा करून लग्न संपादावे.
21)ब्राह्मणांनी ब्राह्मविधीने विवाह करावा.
22)ब्राह्मण जातीने आपली कन्या विक्रय करून विवाह न करावा.
23)सकल ब्राह्मण यांचे स्त्रीने स्वयंपाक करतेवेळेस भोजन करतेवेळेस दर्याईची (रेशमी) चोळी घालावी किंवा धूत वस्त्र सोवळयात घालावे. ते चोळी वस्त्रे धारण करावे.[19]

गावात ज्या काही परंपरा होत्या मानपान होते त्यात कोणीही ढवळाढवळ करीत नसे त्यामुळे गावात शांतता व एकोपा रहात असे. ज्याचे त्याचे काम वर्णाने, कर्माने व शासनाने वाटून दिलेले असे. तो ते काम एक धर्म म्हणून करीत असे. परंतु एक निश्चीत की या काळातील समाज सामाजिक आणि धार्मिक

बंधनाखाली दडपला गेला होता हे पेशवेकालीन 18 व्या शतकातील चालीरिती, रूढी व परंपरेवरून लक्षात येते.

1)भावे वा. कृ पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. क्र. 125
2)भावे वा. कृ.पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. क्र. 127
3)अप्रकाशित कागदपत्रेदप्तर क्र. 16, पत्र क्र. 16072, पुडके क्र. 2, पुराभिलेखागार, पुणे.
4)राजवाडे, वि.का. 'स्मृतिशलाका' इतिहास संशोधन मंडळ, धुळे 1992, पृ. क्र. 49.
5)अप्रक्राशित कागदपत्रे दप्तर क्र. 16, पत्र क्र. 9009, पुडके क्र. 2, पुराभिलेखागार, पुणे.
6)डॉ. बैसाणे अनिल आणि 'मराठकालीन समाज आणि अंधश्रध्दा' डॉ. पाटील सुभाष कल्पना प्रकाशन, नांदेड. प्र.आ. 2005, पृ. क्र. 34
7)तत्रैव पृ. क्र. 35
8)ओतुरकर, रा.वि. 'पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार' भारतीय इतिहास संशोधन मंडळ, पुणे, 1950. पृ. क्र. 71.
9)वर्टीकर, शं.हं.'कापशीकर सेनापती घोरपडे' घराण्याची कागपत्रे लेख 5158. पृ. क्र. 171
10)शेजवळकर, त्र्यं.शं.'नागपूर अफेअर्स' भाग–2, खंड–1, पुणे, 1959, पृ. क्र. 295.
11)डॉ. देशमुख, शारदा 'शिवकालीन व पेशवेकालीन स्त्री जीवन', टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, प्र. आ. 1973, पृ. क्र. 8.
12)तत्रैव पृ. क्र. 9
13 तत्रैव पृ. क्र. 11.
14 चाफेकर ना.गो. 'पेशवाईच्या सावलीत' पृ. क्र. 172,173.
15 तत्रैव पृ. क्र.
16 डॉ. देशमुख, शारदा शिवकालीन व पेशवेकालीन स्त्री जीवन', पृ. क्र. 15
17तत्रैव पृ. क्र. 17
18 भावे, वा. कृ.'पेशवेकालीन महाराष्ट्र', पृ. क्र. 107.
19तत्रैव पृ. क्र. 107

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org